# गिरगावकरांना पुनर्विकासाची खूशखबर



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या मेट्रो-३ प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या गिरगावमधील ३० जुन्या इमारतींमधील ७३३ रहिवाशांचे पुनर्वसन गिरगावमधील नवीन बहुमजली टॉवरमध्ये केले जाणार आहे. ही घरे त्यांच्या सध्याच्या घरांपेक्षा मोठी असून अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असणार आहेत. नवीन ४८ मजली टॉवरमध्ये ४७३ घरे, १३३ व्यावसायिक दुकाने आणि १९ व्यावसायिक कार्यालये असून त्यात गिरगावमधील सर्व रहिवाशांचे पुनर्वसन केले जाणार आहे. सध्या या टॉवरच्या तळघरावरील स्लॅबचे काम जोरात सुरू आहे.

▮ छाया : सचिन वैद्य